'कान, नाक, घसा तज्ञ' पदावर दि.०१/०१/२०२० रोजी काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची अंतिम सेवाजेष्ठतासुची प्रसिध्दीबाबत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -४११०१८
क्र.प्रशा/१२/कावि/ ३६२ /२०२०
दिनांक ०५ /१०/२०२०

वाचले क्र.१) आदेश क्र.प्रशा/१२/कावि/८९/२०२० दि.२४/०२/२०२० अन्वये प्रसिध्द केलेली 'कान, नाक, घसा तज्ञ' पदाची दि.०१/०१/२०२० रोजीची तात्पुरती अतिरिक्त प्राथमिक सेवाजेष्ठतासुची
२) आदेश क्र.प्रशा/१२/कावि/२७४/२०१९ दि.०८/०३/२०१९ अन्वये प्रसिध्द केलेली 'कान, नाक, घसा तज्ञ' पदाची दि.०१/०१/२०१९ रोजीची अंतिम सेवाजेष्ठतासुची
३) अधिकार प्रदान आदेश क्र. प्रशा/१/कावि/कावि/११७५/२०१३ दि.२९/०८/२०१३
४) मा.आयुक्त यांचेकडील परिपत्रक क्र.प्रशा७/कावि/६५/१२दि.१९/१/२०१२
५) प्रशासन विभागाकडील दि. ३० / ०९ / २०२० चा मान्य प्रस्ताव

## आदेश

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, मंत्रालय, मुंबई ३२ दि.२१/१०/२०११ अन्वये दि.०१/०१/२०१९ ते दि.३१/१२/२०१९ या कालावधीत **'कान, नाक, घसा तज्ञ'** या पदावर नियमित पदोन्नती, सरळसेवा वा अन्य विहित मार्गाने नियुक्त ०१ अधिकाऱ्यांची दि.०१/०१/२०२० रोजीची तात्पुरती अतिरिक्त (Provisional Additional) प्राथमिक जेष्ठतासुची उपरोक्त वाचले क्र.१ अन्वये प्रसिध्द करण्यात आली होती. सदरच्या तात्पुरती अतिरिक्त प्राथमिक जेष्ठतासुचीमधील अधिकाऱ्याचे नावाबाबत, जातप्रवर्ग, जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता, रुजू तारीख, जेष्ठता क्रम, नियुक्तीचा मार्ग, सेवानिवृत्ती दिनांक अथवा सुचीमध्ये नांव नसलेबाबत हरकती काही आक्षेप असल्यास त्याबाबत संबंधित कर्मचाऱ्यांनी आपला आक्षेप लेखी निवेदन सादर करून ही तात्पुरती अतिरिक्त प्राथमिक जेष्ठतासुची प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाचे आत संबंधित शाखाप्रमुखांमार्फत योग्य त्या पुराव्यासह सादर करणेबाबत कळविणेत आलेले होते.

**'कान, नाक, घसा तज्ञ'** पदाची तात्पुरती अतिरिक्त प्राथमिक जेष्ठतासुची संबंधित अधिकाऱ्यांना बजाविलेबाबत संबंधित शाखाप्रमुखांकडुन अहवाल प्राप्त झालेला नाही. शाखाप्रमुखांनी मुदतीत आक्षेप प्रशासन विभागाकडे सादर न केल्यास अंतिम सेवाजेष्ठतासुची प्रसिध्दीनंतर काही वाद निर्माण झाल्यास उपरोक्त वाचले क्रमांक ४ नुसार अन्वये याबाबतची संपुर्ण जबाबदारी शाखाप्रमुखांची राहील. प्रस्तुत तात्पुरती अतिरिक्त प्राथमिक सेवाज्येष्ठतासूचीवर एकही आक्षेप प्राप्त झालेला नाही.

सबब उपरोक्त वाचले क्र.३ चे प्राप्त अधिकारान्वये **'कान, नाक, घसा तज्ञ'** पदाची दि.०१/०१/२०१९ रोजीची अंतिम जेष्ठतासुची व दि.०१/०१/२०२० रोजीची तात्पुरती अतिरिक्त प्राथमिक जेष्ठतासुची दि.०१/०१/२०२० या आधारभुत दिनांकास ०२ अधिकाऱ्यांची अंतिम सेवाजेष्ठतासुची या आदेशान्वये प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर अंतिम जेष्ठतासुची महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियम १९८२ दि.२१ जुन १९८२ मधील तरतुदींच्या अनुषंगाने तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि.२१/१०/२०११ मधील सुचनांनुसार तयार केली आहे.

ही अंतिम सेवाजेष्ठतासुची मे.न्यायालयात दाखल केलेल्या अन्य कोणताही विशेष निर्वाणी अर्ज/ याचिकेवरील निर्णयामुळे पुर्वीची अथवा या जेष्ठतासुचीत बदल करावा लागेल, त्या निर्णयाच्या अधिन राहुन असेल.

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८.

प्रतः- संबंधित विभाग

------------------------

२/- सदर आदेश व सेवाजेष्ठतासुची मनपाच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून सदरची प्रत संबंधित अधिकाऱ्यांचे निदर्शनास आणुन द्यावी.

प्रशासन अधिकारी (२)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 411 018

**कान, नाक, घसा तज्ञ पदाची दि.01/01/2020 रोजीची अंतिम सेवाजेष्ठतासूची**

**सुधारीत वेतनश्रेणी - 15600 - 39100 ग्रेड वेतन - 6600**

| अ. क्र. | संगणक क्र. | अधिकाऱ्याचे नाव | प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | जन्म दिनांक | कान, नाक, घसा तज्ञ रुजु तारीख | नियुक्तीचा मार्ग (पदोन्नत/ सरळसेवा) | मनपामध्ये कामास लागलेचे | | सेवानिवृत्ती दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | पद | तारीख | | |
| 1 | 9454 | पवार सुनिल जगन्नाथ | अनुसुचित जमाती | एम.बी.बी.एस., डी.एल.ओ. | 26/05/1979 | 11/03/2013 | सरळसेवा | वैद्यकीय अधिकारी | 21/06/2007 | 31/05/2037 | खुल्यातून नेमणूक |
| 2 | 11506 | चव्हाण परमानंद देवदास | विमुक्त जाती (अ) | एम.बी.बी.एस., एम.एस., ई.एन.टी. | 26/10/1981 | 24/10/2017 | सरळसेवा | कान, नाक, घसा तज्ञ | 24/10/2017 | 31/10/2039 | |

प्रशासन अधिकारी (2)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी 411 018

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी 411 018